क्रमांक : १०४

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग - दोन**

**गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ / श्रावण ५, १९४५ (शके)**

१०४: शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी अशासकीय कामकाज घेण्यात येणार आहेत. उक्त दिवशी अशासकीय कामकाजातील विचारार्थ एकूण ०८ अशासकीय विधेयके चर्चेकरिता घेण्यासाठी निश्चित करण्यात आले आहेत. अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ अशासकीय विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय विधेयके व ठराव समिती नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी शुक्रवार, दिनांक २८ जुलै,२०२३ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी ३० मिनिटांचा वेळ पुर:स्थापनार्थ असलेल्या अशासकीय विधेयकांना व उर्वरित १२० मिनिटांचा वेळ चर्चेकरीता घेण्यात येणाऱ्या खालील नमूद अशासकीय विधेयकांना देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,२०१९ — **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| २) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ — **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ३) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ४) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ५) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - **श्री.अमित साटम,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ६) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - **श्री.प्रकाश आबिटकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ७) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ — महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ८) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ — महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री. सुनिल प्रभू,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २७ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (website.)

C:\Users\...\Desktop\पत्रक भाग दोन.docx